# ‘प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**बुधवार, दि.२५/०३/२०२०**
**वेळ: १८.१५**

## “मनाई आदेश झुगारुन दुकाने इत्यादी चालू ठेवणाऱ्यांविरुध्द, ४ गुन्हे दाखल.”

**उस्मानाबाद जिल्हा:** संसर्गजन्य आजार कोरोनाच्या प्रसारास प्रतिबंध व्हावा, गर्दी टाळावी या उद्देशाने जिल्ह्यातील पानटपरी, हॉटेल, दुकाने इत्यादी बंद ठेवण्याचा शासन आदेश झाला असतांनाही दि. २४.०३.२०२० रोजी १)महादेव विजय गोरे २)नागेश विश्वनाथ कांबळे दोघे रा. लोहारा यांनी अनुक्रमे लोहारा येथे दोन वेगळ्याठिकाणी हॉटेल व पानटपरी चालू ठेवली तर ३) अजय मोहन डोंगे ४) अनिल बळवंतराव कठारे दोघे रा. उस्मानाबाद यांनी अनुक्रमे उस्मानाबाद येथे दोन वेगळ्या ठिकाणी वर्कशॉप व कापड दुकान चालू ठेवले. अशा प्रकारे त्यांनी लोकसेवकाने (जिल्हाधिकारी) दिलेल्या कायदेशीर आदेशाचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्याबद्दल भा.दं.वि. कलम- १८८, सह, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम क्र. ११ अन्वये वरील सर्वांविरुध्द स्वतंत्र ४ गुन्हे संबंधीत पो.ठा. येथे दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आले आहेत.

## “रस्ते अपघात, एक मयत.”

**पोलीस ठाणे, ढोकी:** तुकाराम दगडु देडे वय ३५ वर्षे, रा. पानवाडी, ता. उस्मानाबाद हे दि. ०९.०३.२०२० रोजी १०.०० वा. सु. पानवाडी ते रामवाडी रस्त्याने पायी चालत जात होते. यावेळी ट्रॅक्टर क्र. एम.एच. २५ एडी १३५९ च्या अज्ञात चालकाने ट्रॅक्टर निष्काळजीपणे, हयगयीने चालवून तुकाराम देडे यांना पाठीमागुन धडक दिल्याने वैद्यकीय उपचारादरम्यान ते मयत झाले. अशा मजकुराच्या दत्तु दगडु देडे रा. पानवाडी यांच्या फिर्यादीवरुन वरील ट्रॅक्टरच्या अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

**पोलीस ठाणे, उमरगा:** अफसर सरदार पटेल रा. मुरुळी, ता.उमरगा हे दि. २२.०३.२०२० रोजी २१.०० वा. सु. मौजे कदेर शिवारातील रस्त्याने मोटारसायकल चालवत जात होते. यावेळी स्वीफ्ट क्र. एम.एच. ०१ एसए ३६९९ च्या अज्ञात चालकाने स्वीफ्ट निष्काळजीपणे, हयगयीने चालवून अफसर पटेल यांच्या मो.सा. ला धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर जखमीस वैद्यकीय उपचाराची तजबीज न ठेवता, अपघाताची खबर पोलीसांना न देता स्वीफ्ट चालक घटनास्थळावरुन निघुन गेला. अशा मजकुराच्या अफसर पटेल यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन वरील स्वीफ्टच्या अज्ञात चालकाविध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

**पोलीस ठाणे, आनंदनगर:** पदमाकर सुखदेव लोमटे, पदमिनी सुखदेव लोमटे दोघे रा. उस्मानाबाद हे दि. ०३.०३.२०२० रोजी १७.३० वा. सु. मौजे शिंगोली येथील रस्त्यावर मोटारसायकलने प्रवास करत होते. यावेळी राहुल लक्ष्मण न्नवरे रा. केज, ता.केज, जि.बीड यांनी विस्टा कार क्र. एम.एच. ४४ जी ०८३५ ही निष्काळजीपणे चालवून पदमाकर लोमटे चालवत असलेल्या मो.सा. ला धडक दिली. या अपघातात पदमाकर लोमटे व पदमिनी लोमटे हे दोघे गंभीर जखमी झाले. जखमींस वैद्यकीय उपचारास न नेता,

अपघाताची खबर पोलीसांना न देता विस्टा कार चालक घटनास्थळावरुन निघुन गेला. अशा मजकुराच्या पदमाकर लोमटे यांनी वैद्यकीय उपचारानंतर दिलेल्या फिर्यादीवरुन वरील विस्टा चालकाविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “मारहाण, गुन्हा दाखल.”

**पोलीस ठाणे, परंडा:** अमोल अर्जुन नरुटे रा. ईडा, ता. भुम हे व त्यांचे कुटूंबीय दि. २४.०३.२०२० रोजी ११.३० वा. सु. त्यांच्या ईडा येथील घराचे बांधकामावर होते. यावेळी भाऊबंद राहिनीबाई लहु नरुटे, राणी संतोष नरुटे यांनी “तुम्ही शेत गट क्र. ११८ मध्ये बांधलेले घर आत्ताच काढून टाका.” असे अमोल नरुटे व त्यांच्या कुटूंबीयांना धमकावून शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, दगड फेकून मारुन जखमी केले. अशा मजकुराच्या अमोल नरुटे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “दागिने चोरीस.”

**पोलीस ठाणे, परंडा:** छकुबाई दत्तात्रय शिंदे रा. लोणी, ता. परंडा यांच्या राहत्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहुन घरातील कपाटातील २१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दगिने किं.अं. १,०२,३००/- रु. चे दि.१९.०३.२०२० रोजी २०.३० वा. सु. अज्ञात चोरट्याने चोरुन नेले आहेत. अशा मजकुराच्या छकुबाई शिंदे यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “धावत्या मिनी ट्रक मधील साहित्य चोरीस.”

**पोलीस ठाणे, येरमाळा:** बाबासाहेब मौला शेख रा. येरमाळा, ता.कळंब हे दि. २१.०३.२०२० रोजी ०२.०० वा. सु. वाशिम ते येरमाळा ट्रक क्र. एम.एच. १४ डीएम ५१३१ मध्ये विवाह कार्यातील साहित्य घेउन येत होते. कळंब ते येरमाळा प्रवासादरम्यान टॅम्पो मधील गादी, लग्नातील तीन पोती भांडी, साड्यांचे तीन बॉक्स एकत्रीत किं.अं. ५०,५००/- रु. चे साहित्य अज्ञात चोरट्याने धावत्या ट्रकच्या मागच्यामागून चोरले आहे. अशा मजकुराच्या बाबासाहेब शेख यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दि. २५.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “जनावरांची निर्दयीपणे वाहतुक, गुन्हा दाखल.”

**पोलीस ठाणे, भुम:** आसाराम त्रिंबक नागपुरे रा. नेवासा, जि.अहमदनगर हा दि. २४.०३.२०२० रोजी ००.१० वा. सु. गोलाई चौक, भुम येथे ट्रक क्र. एम.एच. १६ सीसी २९२९ मधुन ९ म्हशी व ७ रेडके दाटीवाटीने भरुन, त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था न करता निर्दयीपणे वाहतुक करत असतांना पो.ठा. भुम यांच्या पथकास आढळले. यावरुन वरील आरोपींविरुध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “जुगार अड्ड्यावर छापे”

**पोलीस ठाणे, भुम:** १)महेबुब मनियार २)आतिख कुरेशी ३)सोफियान कुरेशी ४)आरिफ मणियार ५)शाहरुख फकीर ६)सत्तार सय्यद ७)अदिल पठाण सर्व रा. भुम हे सर्व दि. २४.०३.२०२० रोजी वारेवडगाव रस्त्यालगत भुम येथे तिरट जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्यासह एक हिरो मो.सा. क्र. एम.एच. १३

डब्ल्यु ८९१३ किं.अं. २०,०००/- रु. व रोख रक्कम ५,५००/- रु. असा एकुण २५,५००/-रु. च्या मालासह उपविभागीय पोलीस अधिकारी, भुम यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन वरील आरोपींविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद (शहर):</u>** १)अबरार खय्याम शेख २)अरशाद अशफाक नाईकवाडी ३)माजीद अहमद काझी ४)संतोष प्रताप मैंदरकर सर्व रा. उस्मानाबाद हे सर्व दि. २४.०३.२०२० रोजी सुमैय्या साडी सेंटर जवळ, उस्मानाबाद येथे व्हिडीओ गेम खेळत असतांना व्हिडीओ गेमचे साहित्यासह एक टीव्ही, व्हिडीओ कॉन चा एक मॉनिटर, गेम खेळण्याचे १२ रिमोट एकत्रीत किं.अं. १३,४००/- रु. चे साहित्य पो.ठा. उस्मानाबाद (शहर) यांच्या पथकास गस्ती दरम्यान आढळुन आले. यावरुन वरील आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम- १८८ सह, म.जु.का. कलम- १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. २५.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "अवैध मद्य विक्री विरुध्द कारवाया."

**<u>पोलीस ठाणे, वाशी:</u>** सुनिल सुबराव भैरट रा. शेलगांव, ता. वाशी हे दि. २४.०३.२०२० रोजी मौजे शेलगांव शिवारात दारुचा अवैध विक्री व्यवसाय करत असतांना विदेशी दारुच्या बाटल्या कि.अं. ३३०/-रु. च्या मालासह पो.ठा. वाशी यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

**<u>पोलीस ठाणे, उमरगा:</u>** १)भिमया नागया तेलंग रा.एकोंडी, ता.उमरगा २)सुरेखा गणेश चौधरी रा.डिग्गी, ता.उमरगा हे दोघे दि. २४.०३.२०२० रोजी त्यांच्या राहत्या घरासमोर दारुचा अवैध विक्री व्यवसाय करत असतांना ४२ ली. गावठी दारु व २० ली. ताडी दारु एकत्रीत कि.अं. ३,४००/-रु. च्या मालासह पो.ठा. उमरगा च्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन १५ कारवाया."

**<u>उस्मानाबाद जिल्हा:</u>** दि. २४/०३/२०२० रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व शहर वाहतुक शाखा-उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार १५ कारवाया केल्या असुन त्यातुन ५,४०० ₹ **'तडजोड शुल्क'** वसुल करण्यात आले आहे.

---

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद